follow us : /rajdandlive

मराठी माणसाचा मानदंड

# राजदंड

। पश्चिम महाराष्ट्र ।

www.rajdand.com

RNI Regd. No. 72105/99 ❋ वर्ष २६ ❋ अंक ३२९ ❋ सातारा ❋ गुरूवार दि.२९ ऑगस्ट २०२४ ❋ पाने ४ ❋ किंमत ५/- रूपये

## मालवणच्या राजकोट किल्ल्यावर राणे आणि ठाकरे समर्थकांमध्ये खडाजंगी!

**मालवण** : राजकोट किल्ल्यावर उभारण्यात आलेला छत्रपती शिवाजी महाराजांचा पुतळा अवघ्या आठ महिन्यांतच कोसळल्याने राज्यभरात प्रचंड संतापाची लाट उसळली आहे.

विरोधकांकडून मात्र या गोष्टीचे फोटोज व्हायरल करत राजकारण केलं जात आहे. यावरुन काल उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनीदेखील टीका केली होती. यानंतर आज महाविकास आघाडीकडून पुतळा कोसळल्याच्या निषेधार्थ आज मोर्चाचे आयोजन करण्यात आले आहे.

याचवेळी खासदार नारायण राणे किल्ल्यावर पोहोचल्याने ठाकरे आणि राणेंचे समर्थक एकमेकांना भिडल्याचे पाहायला मिळाले. तसेच कट्टर विरोधक असलेले नारायण



राणे आणि विजय वडेट्टीवारही आमनेसामने आले, मात्र त्यांनी यावेळेस हस्तांदोलन केले.

महाविकास आघाडीमधील नेत्यांसह सत्ताधारी महायुतीमधील नेतेसुद्धा पोहोचले आहेत. खासदार नारायण राणे माजी खासदार निलेश राणे यांच्यासह शिवरायांच्या पुतळ्याची पाहणी करण्यासाठी राजकोटवर पोहोचले. या दरम्यान काँग्रेस नेते विजय वडेट्टीवार सुद्धा पोहोचले. महाविकास आघाडीकडून मोर्चा आयोजित करण्यात आल्याने माजी खासदार विनायक राऊत यांचे समर्थक सुद्धा राजकोट किल्ल्यावर पोहोचले आहेत. राणे समर्थक आणि राऊत समर्थक आमने सामने आल्याने राजकोट किल्ल्यासमोर घोषणाबाजी देत एकमेकांच्या अंगावर धावून जाण्याचा प्रसंग सुद्धा घडला.

**महाविकास आघाडीकडून भरड नाका ते तहसीलदार कार्यालयापर्यंत मोर्चाचे आयोजन करण्यात आलं आहे. हा राडा एका बाजूने सुरू असतानाच शिवसेना ठाकरे गटाचे आमदार आदित्य ठाकरे सुद्धा पोहोचले. यावेळी पेंग्विन, पेंग्विन अशा घोषणा देण्यात आल्या. पोलिसांनी लगेच कार्यकर्त्यांना बाजूला घेतले. मात्र आक्रमक कार्यकर्त्यांमध्ये हाणामारी झाली. मालवणमध्ये तणावाची परिस्थिती निर्माण झाली.**

## मी महाराष्ट्राच्या १३ कोटी जनतेची माफी मागतो

### अजित पवारांनी हात जोडले



**अजित पवारांनी मागितली माफी**

**छत्रपती शिवाजी महाराजांचा पुतळा वाऱ्यामुळे पडला. मात्र, याप्रकरणी दोषींवर कारवाई करण्यात येणार आहे. मी राज्याचा उपमुख्यमंत्री म्हणून राज्यातील तेरा कोटी लोकांची जाहीर माफी मागतो. यातील सर्व दोषी लोकांवर कडक कारवाई करण्यात येईल, असे म्हणत अजित पवार यांनी पुतळा दुर्घटनेप्रकरणी महाराष्ट्राची माफी मागितली आहे. तसेच, या पुतळ्याचे काम चांगलेच झाले पाहिजे होते, हे सर्व लोक राष्ट्रनिर्मिती करण्यात अग्रेसर राहिले आहेत. त्यांचे विचार कायमच आपणास प्रेरणा देत असतात, यातील जे दोषी असतील त्यांना सोडणार नाही. आज शब्द देतो की अशी चूक पुन्हा होऊ, नये यासाठी काम करणार असल्याचेही अजित पवार यांनी म्हटले.**

**लातूर** : छत्रपती शिवाजी महाराज यांचा पुतळा कोसळल्याच्या घटनेवरुन राज्यात विरोधी पक्षातील नेत्यांनी आक्रमक पवित्रा घेत आंदोलन केले. तर, महाविकास आघाडीच्या नेतृत्त्वातील तिन्ही पक्षांचे वरिष्ठ नेते आज छत्रपती शिवाजी महाराजांचा पुतळा कोसळलेल्या घटनास्थळी दाखल झाले आहेत. मात्र, तत्पूर्वीच याठिकाणी भाजप नेते आणि खासदार नारायण राणे व त्यांचे पुत्र उपस्थित होते. त्यामुळे, आदित्य ठाकरेंचा ताफा येताच राणे आणि ठाकरेंच्या समर्थकांमध्ये किल्ल्यावरच राडा झाल्याचं पाहायला मिळालं. एकीकडे महाविकास आघाडीचे नेते आणि राणे पिता पुत्र समर्थकांमध्ये मालवणमध्ये राडा सुरू असतानाच दुसरीकडे राज्याचे उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी शिवरायांच्या पुतळा दुर्घटनेवरुन राज्यातील १३ कोटी जनतेची माफी मागितली आहे. अजित पवार यांनी जनसन्मान यात्रेत भाषण करताना पुतळा दुर्घटनेतील दोषींना सोडणार नाही, असा इशाराही दिला आहे.

लातूर येथील जनसन्मान यात्रेत बोलताना अजित पवार म्हणाले, मी कधीही विरोधकांवर टीका केली नाही, आम्ही कामची माणसे आहोत. आम्ही १५ हजार कोटींचे वीज बिल माफ केले आहे. शेतकऱ्यांनी आता फक्त मोटर चालू करायची आहे, मागच्या वीज बिलाचा विचार करायचा नाही, बाकी मी पाहतो, असे म्हणत अजित पवार यांनी वीजबिल माफी केल्याची माहिती दिली.



## लसणाची फोडणी देणे पडणार महागात

**मुंबई** : गेल्या काही दिवसांपासून सर्वसामान्यांना लागणाऱ्या गरजोपयोगी गोष्टींचे भाव सातत्याने वाढत चालले आहेत. त्यामुळे सर्वसामान्यांच्या खिशाला चांगलाच फटका बसत आहे. अशातच गृहिणींच्या स्वयंपाक घरातील लसणाची फोडणी पुन्हा एकदा महागल्याचे चित्र दिसून येत आहे. लसणाच्या उत्पादनात घट होत असल्याने भाव वाढत आहेत. त्यामुळे आधीच महागाईमुळे त्रस्त असलेल्या नागरिकांना वाढलेल्या लसणाच्या दरामुळे महागडा लसूण विकत घ्यायचा तरी कसा, असा प्रश्न पडत आहे.

मिळालेल्या माहितीनुसार, गेल्या काही वर्षापासून लसणाच्या लागवडीत घट होत आहे. त्यामुळे शेतकऱ्यांनी साठवलेला लसूण विक्रीसाठी बाहेर काढला होता. त्यामुळे यंदा लसणाची साठवणूक कमी आणि ग्राहकांची मागणी मोठ्या प्रमाणात होत आहे. बाजारात सध्या लसूणचा भाव ४०० रुपये प्रति किलोवर पोहचला आहे. तर हाच लसूण घाऊक बाजारात २०० ते ३२० रुपये प्रतिकिलो रुपयांवर विकला जात आहे. पुढील काही महिन्यांत हा भाव आणखी वाढून तब्बल ६०० रुपयांपर्यंत पोहचू शकतो अशी शक्यता विक्रेत्यांनी व्यक्त केली आहे.

### लसणाचे दर कमी केव्हा होणार?

**लसूण महागल्यावर आता पुन्हा दर किती दिवसांपर्यंत कमी होतील असा प्रश्न नागरिकांच्या मनात येत याहे. जानेवारी ते मे या कालावधीमध्ये नवीन लसूणचे उत्पादन होते. त्यानंतर आवक फेब्रुवारीपर्यंत सुरळीत होते. त्यामुळे या वर्षी तरी नागरिकांना महागडाच लसूण खावा लागणार असल्याची शक्यता आहे.**

## म्हाडा संघर्ष कृती समितीचे धरणे आंदोलन

**मुंबई** : म्हाडा पुनर्रचित ३८८ इमारतीमधील दीड लाख रहिवाशी आक्रमक होत ३३(२४) च्या अधिसूचनेवर सरकारी धोरणाला स्थगिती दिल्याने म्हाडा संघर्ष कृती समितीच्या वतीने बुधवारी आझाद मैदान येथे ३८८ इमारतीमधील ३० हजार कुटुंबीयांनी एक दिवसीय धरणे आंदोलन केले.



विधानसभा निवडणुकीच्या तोंडावर मुंबईतील म्हाडा ईमारत दुरस्ती मंडळ इमारतींचा पुनर्विकासाचा प्रश्न ऐरणीवर आला असून सरकारने जर आमच्या मागण्या मान्य केल्या नाही तर पुढील आंदोलन कुटुंबासह तीव्र आंदोलन करण्याचा इशारा अध्यक्ष अजित कदम यांनी यावेळी दिला.

गेल्या पावसाळी अधिवेशनात २३ जुलै २०२३ रोजी मुख्यमंत्री एकनाथजी शिंदे यांनी उपकर प्राप्त असलेल्या इमारतींसाठी असलेल्या ३३ ( ७ ) या धोरणाचे फायदे ३३ (२४ ) मध्ये समाविष्ट करण्याचे आदेश दिले होते. परंतु ३ नोव्हेंबर २०२३ रोजी ३३ (२४ ) ही अधिसूचना काढताना पुन्हा एकदा नगर विकास खात्याने ३३ ( ७ ) धोरणातील कायद्याचे कोणतेही स्पष्टीकरण न दिल्यामुळे ३८८ पैकी एकाही इमारतीचा प्रस्ताव सादर होऊ शकला नाही असे सचिव विनिता राणे यांनी सांगितले.

याबाबत म्हाडा संघर्ष कृती समितीच्या वतीने वारंवार म्हाडाचे मुख्य कार्यकारी अधिकारी शंभरकर यांच्याबरोबर झालेल्या बैठकीत ३३ ( ७ ) चे सर्व फायदे देण्यास त्यांनी असमर्थता दर्शवली कारण नगर विकास खात्याने ते ३३ (२४ ) ची अधिसूचना जाहीर करताना ३३ (७ ) च्या लाभाची स्पष्टता न दिल्यामुळे आम्ही ते तुम्हाला देऊ शकत नाही असे म्हाडा प्रशासनाचे म्हणणे आहे.अशी माहिती खजिनदार शाम म्हामुणकर यांनी यावेळी सांगितले. नगर विकास आणि म्हाडा एकमेकांवर टोलवाटोलवी करत असल्यामुळे म्हाडा ३८८ इमारतीमधील लाखो रहिवाशांचा जीव टांगणीला लागलेला आहे त्यामुळे जीव मुठीत घेऊन राहणारे लाखो रहिवाशी आक्रमक झाले आहेत. सरकारने याबाबत गांभीर्याने विचार करावा अशी मागणी यावेळी कार्याध्यक्ष एकनाथ रजपुरे यांनी केली.

## आझाद मैदानातील सरपंचांच्या आंदोलनासाठी उध्दव ठाकरे..नाना पटोले अन् शरद पवार

मुंबई :ग्रामीण भागाचा कणा असलेला सरपंच हा महत्वाचा घटक आहे. त्यांच्या मागण्या म्हणजे सामान्य जनतेच्या मागण्या असतात. आमचे सरकार सत्तेत असताना या घटकासाठी अनेक लाभ मिळाले होते. भविष्यात या घटकाच्या सर्व मागण्या पूर्ण करू. असे आश्वासन देण्यासाठी जाणते राजे शरद पवार, उध्दव ठाकरे व नाना पटोले यांनी बुधवारी आझाद मैदानात येऊन सरपंच, ग्रामरोजगार सेवक, संगणक परिचालक, ग्रामविकास अधिकारी यांच्या आंदोलनाला पाठिंबा दिला.




यावेळी बोलताना उध्दव ठाकरे म्हणाले, आता आमच्या हातात फक्त माईक आहे म्हणून आम्ही आता फक्त शब्द देऊ शकतो. सत्तेत आल्यावर आपल्या सर्व मागण्या मान्य पूर्ण करू. तर नाना पटोले म्हणाले, हे खोके सरकारने तुमचे भले करणार नाही. आम्ही सत्तेत आलो तर आपल्या कोणत्याच मागण्या प्रलंबित राहणार नाहीत. तर शरद पवार यांनी सांगितले की, हा घटक आहे म्हणून गावचा विकास होतो. हाच घटक जर दुर्लक्षित राहिला तर गावचा विकास कसा होईल. त्यामुळे आता या घटकाला न्याय दिल्याशिवाय मी गप्प बसणार नाही.

मुंबईत सरपंच भवन असेल तर आम्हाला मुंबईत आल्यावर निवासाची सोय होईल. त्यामुळे सरपंच भवन बांधावे. ग्रामपंचायत करांच्या जुन्या थकबाकी साठी अभय योजना असावी. सरपंचांना विमा योजना असावी. मानधन वाढ व सभा भत्ता, १५ लाखापर्यंत विकासकामे करण्याची मान्यता इतर मागण्या यावेळी करण्यात आल्या. मोठ्या संख्येने आझाद मैदानात आलेले सरपंच, ग्रामरोजगार सेवक,आल्याने शरद पवार, उध्दव ठाकरे नाना पटोले यांनी भेट दिल्याने आंदोलन कर्ते आनंदी झाले.



## शक्तीपीठ महामार्गानतंर पुणे नाशिक महामार्गात मोठा अडथळा

### ८००० कोटींचा निधी मंजूर होऊन प्रकल्प रखडणार

**नागपूर** : गोवा शक्तीपीठ महामार्गानतंर पुणे नाशिक महामार्ग प्रकल्पात देखील मोठा अडथळा आला आहे. या महामार्गासाठी ८००० कोटींचा निधी मंजूर करण्यात आला आहे. निधी मंजूर होऊन प्रकल्प रखडण्याची चिन्हे आहेत. या प्रकल्पाविरोधात १४ गावचे ग्रामस्थ एकवटले आहेत. या महामार्गामुळे पुणे-नाशिक प्रवास फक्त ३ तासात पूर्ण करता येणार आहे. तसेच या महामार्गामुळे राजगुरुनगर, चाकण, मंचर मार्गे थेट शिर्डीला जाता येणार आहे.

राज्यभरात मोठ्या प्रमाणात महार्गांचे जाळे तयार केले जात आहे. या पैकीच एक आहे तो पुणे-नाशिक औद्योगिक महामार्ग. पुणे-नाशिक औद्योगिक महामार्ग हा सरकारचा एक महत्वाकांक्षी प्रकल्प आहे. पुणे-नाशिक औद्योगिक द्रुतगती महामार्गामुळे जलद प्रवास आणि वेळेची बचत करणारा आहे. या महामार्गमुळे पुणे-नाशिक अंतर अवघ्या तीन तासात पार होणार आहे. या महामार्गावरुन राजगुरुनगर, चाकण, मंचर मार्गे थेट शिर्डीला जाता येणार आहे. हा महामार्ग २१३ किलोमीटर लांबीचा असणार आहे. या महामार्गासाठी २०,००० कोटींचा खर्च अपेक्षित आहे. केंद्रात सत्तेत असलेल्या मोदी सरकारने हिरवा कंदील दिला असून त्यासाठी तब्बल ८ हजार कोटी रुपयांचा निधी मंजूर केला आहे.

पुणे-नाशिक औद्योगिक महामार्गाविरोधात

पुणे नाशिक महामार्गाला औद्योगिक वाहतुकीसाठी पर्यायी बंधीस्त मार्ग बांधला जात आहे. पुणे जिल्ह्यात येणाऱ्या जुन्नर तालुक्यातील १४ गावच्या ग्रामस्थांनी या महामार्गाला विरोध केला आहे. हा मार्ग बागायती क्षेत्र, लोकवस्तीमधून जात असल्याने शेतकऱ्यांनी पुणे नाशिक औद्योगिक महामार्गाच्या जमिन संपादनाला थेट विरोध केला आहे. आमचा विकासाला विरोध नाही. मात्र, विश्वासात न घेता बागायती क्षेत्रातुन महामार्ग जात असल्याने अनेक शेतकरी भुमीहीन होत असल्याने याचा गांभिर्याने विचार व्हावा अशी मागणी ग्रामस्थांनी केली. पुणे-नाशिक औद्योगिक महामार्गाविरोधात १४ गावाच्या ग्रामस्थांनी राजुरी येथे साखळी उपोषणाला सुरुवात केली आहे.

कोल्हापूर आणि सांगलीमधला हा विरोध आहे तो शक्तिपीठ महामार्गाला... कोल्हापूर तसंच सांगलीसह एकूण ११ जिल्ह्यांतून शक्तीपीठ महामार्ग जातोय.. मात्र शेकडो एकर जमीन प्रभावीत होत असल्याने तो रद्द करण्याची मागणी शेतकऱ्यांनी केली आहे.



## राज्यातील महानगरपालिका कामगारांचे आंदोलन

**मुंबई** : महाराष्ट्रातील महानगरपालिका अंतर्गत काम करणाऱ्या कामगार कर्मचाऱ्यांच्या विविध प्रलंबित मागण्यांच्या सोडवणूकीसाठी महाराष्ट्र राज्य महानगरपालिका कर्मचारी संघटना फेडरेशन च्या वतीने कायम व कंत्राटी कामगारांच्या प्रलंबीत मागण्यांसाठी आझाद मैदानात बुधवारी धरणे निदर्शने आंदोलन करण्यात आले.

यावेळी अध्यक्ष शशिकांत ऊर्फ बबनराव झिंजूर्डे म्हणाले, राज्यशासनाकडे अनेक वेळा निवेदने दिली. मात्र सरकारने अद्याप काहीच मागण्या मान्य केल्या नाहीत.

मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या अध्यक्षतेखाली २३ फेब्रुवारी २०२३ रोजी विधान भवन, मुंबई येथे नगरविकास विभाग व मुख्य सचिव व वित्त विभागाचे सचिव यांच्या उपस्थितीत जी बैठक झाली मात्र अद्याप काहीही मागण्या मान्य झाल्या नाहीत. त्यामुळे सरकारने निवेदनात दिलेल्या ८ मागण्या त्वरित मान्य कराव्या अशी मागणी प्रमुख सरचिटणीस कॉम्रेड गणेश शिंगे यांनी यावेळी सरकारकडे केली.

# राष्ट्रीय क्रीडा दिन

आज २९ ऑगस्ट म्हणजेच 'राष्ट्रीय क्रीडा दिन'. हॉकीचे सर्वकालीन महान खेळाडू मेजर ध्यानचंद या महान खेळाडूचा गौरव म्हणून २९ ऑगस्ट हा दिवस 'राष्ट्रीय क्रीडा दिन' म्हणून देशभर साजरा केला जातो. या दिवशी राष्ट्रपतींच्या हस्ते राजीव गांधी खेलरत्न पुरस्कार, अर्जुन पुरस्कार, द्रोणाचार्य पुरस्कारांचे वितरण करण्यात येते. शिवाय खेळातील सर्वोच्च जीवन गौरव पुरस्कार म्हणून २००२ पासून ध्यानचंद पुरस्कार देण्यात येतो.

हॉकीचे जादूगार मेजर ध्यानचंद यांची जयंती राष्ट्रीय क्रीडा दिन म्हणून साजरी करण्यात येते. हॉकीच्या मैदानात ध्यानचंद यांनी अविश्वसनीय कामगिरीची नोंद केली आहे. त्यांच्या कारकिर्दीत भारताने ऑलिम्पिक स्पर्धेत तीन वेळा गोल्डन कामगिरी (१९२८, १९३२ आणि १९३६) नोंदवली आहे. अनेक दशकानंतही त्यांची जादू कायम आहे. मेजर ध्यानचंद हे भारतीय क्रीडा क्षेत्रातील एक प्रेरणादायी आणि व्यक्तिमत्व आहे. सरकारने १९५६ मध्ये ध्यानचंद यांना पद्मभूषण पुरस्काराने गौरविण्यात आले. या दिवशी



शैक्षणिक आणि सार्वजनिक संस्थांमध्ये खेळांबद्दल जागरूकता पसरवण्यासाठी या दिवशी क्रीडा कार्यक्रम आयोजित केले जातात. या दिवशी राष्ट्रपती भारताच्या राष्ट्रपती भवनात मेजर ध्यानचंद खेलरत्न पुरस्कारासह प्रमुख क्रीडा संबंधित पुरस्कार प्रदान करतात.

### बर्लिन ऑलिम्पिकमध्ये भारतीय हॉकीसंघाचे नेतृत्व

हॉकीतील लक्षवेधी कामगिरीनंतर ध्यानचंद यांना १९२७ मध्ये 'लांन्स नायक' पदावर बढती देण्यात आली. १९३२ मध्ये नायक आणि १९३६ मध्ये सुभेदार असे प्रमोशन त्यांना मिळत गेले. मैदानातील सातत्यपूर्ण कामगिरीसोबत त्यांची बढती होत राहिली. लेफ्टनंट, कॅप्टन आणि मेजर या पदापर्यंत त्यांनी मजल मारली. मेजर ध्यानचंद यांच्यातील कौशल्याबाबत बोलताना स्टिकला चेंडू जणू चिटकलेला असायचा असे वर्णनही ऐकायला मिळते. मेजर ध्यानचंद यांनी १९३६ मध्ये बर्लिन ऑलिम्पिक स्पर्धेत भारतीय संघाचे नेतृत्व केल होते.

खेलरत्न पुरस्काराचे नाव आता 'मेजर ध्यानचंद खेलरत्न पुरस्कार'

भारतीय खेळाडूंना देण्यात येणाऱ्या खेलरत्न या सर्वोच्च पुरस्काराचे नाव आता बदलण्यात आले आहे. मेजर ध्यानचंद यांच्या कार्याचा गौरव म्हणून या पुरस्काराचे नाव आता 'मेजर ध्यानचंद खेलरत्न पुरस्कार' असं असणार आहे. लेफ्टनंट, कॅप्टन आणि मेजर या पदापर्यंत त्यांनी मजल मारली. त्यांच्याच कार्याच्या स्मरणार्थ आजचा दिवस राष्ट्रीय क्रीडा दिन म्हणून देशभर साजरा केला जातो. राष्ट्रीय क्रीडा दिन दरवर्षी २९ ऑगस्ट रोजी साजरा केला जातो. खेळ केवळ आपल्या तंदुरुस्तीसाठीच महत्त्वाचा नाही तर त्यामुळे मानसिक आरोग्यासाठीही अनेक फायदे मिळतात, परंतु २९ऑगस्ट हा दिवस राष्ट्रीय क्रीडा दिन साजरा करण्यासाठी का निवडला गेला हे तुम्हाला माहीत आहे का? या खास दिवसाशी संबंधित काही रंजक गोष्टी जाणून घ्या.

नवी दिल्ली: २०१२ पासून, दरवर्षी २९ ऑगस्ट हा राष्ट्रीय क्रीडा दिन म्हणून साजरा केला जातो. या दिवशी महान खेळाडू ध्यानचंद यांचा जन्म झाला होता. मेजर ध्यानचंद यांना हॉकीचे जादूगार म्हटले जाते. आपल्या २२ वर्षांच्या कारकिर्दीत ४०० हून अधिक गोल करणाऱ्या या महान खेळाडूच्या स्मरणार्थ भारत सरकारने २०१२ पासून त्यांच्या जयंतीदिनी राष्ट्रीय क्रीडा दिन साजरा करण्याची घोषणा केली होती. १९५६ मध्ये त्यांना देशाचा तिसरा सर्वोच्च सन्मान पद्मभूषण देण्यात आला होता. या खास प्रसंगी या दिवसाशी संबंधित काही रंजक गोष्टी जाणून घेऊया.

### या दिवसाचा इतिहास रंजक आहे

हा दिवस महान हॉकीपटू मेजर ध्यानचंद यांची जयंती आहे. त्यांचा जन्म १९०५ मध्ये अलाहाबादच्या राजपूत कुटुंबात झाला होता. वडिलांच्या पावलावर पाऊल ठेवत ध्यानचंद सैन्यात दाखल झाले आणि सैन्यातच हॉकी खेळू लागले. हॉकीच्या जादूगाराने देशाला अनेक नाव मिळवून दिले. ध्यानचंद हे १९२८, १९३२ आणि १९३६ च्या ऑलिम्पिकमध्ये सुवर्णपदक जिंकणाऱ्या भारतीय हॉकी संघाचा भाग होते. २२ वर्षांच्या कारकिर्दीत त्याने ४०० हून अधिक गोल केले.

### ध्यानचंद यांचे कार्य

ध्यानचंद यांनी १९३६ च्या बर्लिन ऑलिम्पिकच्या अंतिम सामन्यात तीन गोलांसह संघाचे नेतृत्व केले, ज्यात त्यांनी जर्मनीविरुद्ध ८-१ असा विजय मिळवला. हा खेळ ध्यानचंद यांच्या नेतृत्वाखाली भारताच्या हॉकीतील यशाचा शिखर होता. निवृत्त झाल्यानंतरही तो खेळात योगदान देत राहिला. नॅशनल इन्स्टिट्यूट ऑफ स्पोर्ट्स, पटियाला येथे मुख्य प्रशिक्षक म्हणून काम करण्याव्यतिरिक्त त्यांनी राजस्थानमधील अनेक कोचिंग कॅम्पमध्ये शिकवले.

या दिवसाचे महत्त्व काय?

दरवर्षी राष्ट्रीय क्रीडा दिनी, भारताचे राष्ट्रपती अर्जुन पुरस्कार, द्रोणाचार्य पुरस्कार आणि राजीव गांधी खेलरत्न पुरस्कार यांसारखे क्रीडा संबंधित सर्व पुरस्कार प्रदान करतात ज्यांनी त्यांच्या संबंधित खेळांमध्ये देशाला अभिमान मिळवून दिला आहे.

२०१८ मध्ये पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या हस्ते उद्घाटन करण्यात आलेली खेलो इंडिया चळवळ ही गेल्या काही वर्षांत सरकारने या दिवशी सुरू केलेल्या क्रीडा उपक्रमांपैकी एक आहे.

या दिवशी देशभरात विविध स्पर्धांचे आयोजन केले जाते. अनेक महाविद्यालये, शाळा आणि कार्यालये या दिवसाचे महत्त्व लक्षात घेऊन चर्चासत्रे आणि खेळांचे आयोजन करतात.

# मुंबईत दहीहंडीचा थरार!

## १००हून अधिक गोविंदा जखमी; दोघांची प्रकृती गंभीर

**मुंबई** : काल देशभरात मोठ्या जल्लोषात दहीहंडी उत्सव साजरा करण्यात आला. मुंबईत दरवर्षीप्रमाणे विविध ठिकाणी दहीहंडीचे आयोजन करण्यात आले होते. तसेच अनेक भागांत स्पर्धा देखील आयोजित करण्यात आल्या होत्या. एकीकडे दहीहंडीचा उत्साह शिगेला पोहोचला असताना दुसरीकडे थरावरुन कोसळल्याने काही गोविंदा जखमी झाले आहेत. त्यामुळे दहीहंडी सणाला गालबोट लागले आहे. मुंबईत आतापर्यंत १००हून अधिक गोविंदा जखमी झाल्याची माहिती समोर आली आहे. यांच्यामध्ये बालगोविंदाचांही समावेश असून जखमींवर रुग्णालयात उपचार सुरु आहे.

मुंबई महापालिकेने दिलेल्या माहितीनुसार, यंदा मुंबईमध्ये विविध ठिकाणी दही हंडी फोडताना १२९ गोविंदा जखमी झाले. जखमी झालेल्या गोविंदांना उपचारासाठी मुंबईतील केईएम, नायर, सायन, कूपर या मुंबई महानगरपालिकेच्या रुग्णालयांसह जे. जे. रुग्णालय, सेंट जॉर्जेस आणि जी. टी. रुग्णालयात दाखल करण्यात आले आहे. मात्र यामधील दोन गोविंदा गंभीर जखमी झाले आहेत.

मुंबईतील गोविंदांपैकी दोघांची प्रकृती गंभीर असल्याची माहिती मिळत आहे. कुणाल पाटील (२०) या तरुणाला पाठीच्या मणक्याला दुखापत झाली आहे. तर मनू खारवी (२५) याच्या डोक्याला मार लागला आहे. सध्या दोघांवर केईएम रुग्णालयात उपचार सुरु आहेत.

# हातवारे करत नारायण राणेंचा इशारा

**सिंधुदुर्ग** : सिंधुदुर्ग जिल्ह्यातील मालवणच्या राजकोट किल्ल्यावर उभारण्यात आलेला छत्रपती शिवाजी महाराजांचा पूर्णाकृती पुतळा कोसळल्यानंतर आता राजकीय वातावरण चांगलंच तापलं आहे. महाविकास आघाडीतील नेतेमंडळी आज घटनास्थळी भेट देण्यासाठी राजकोट किल्ल्यावर गेली होती. मात्र, तत्पूर्वीच खासदार नारायण राणे आणि त्यांचे पुत्र किल्ल्यावर पोहोचले होते. त्याचवेळी, शिवसेना नेते आणि आमदार आदित्य ठाकरे घटनास्थळी पोहोचले, त्यामुळे राणे समर्थक आणि ठाकरे समर्थक यांच्यात जोरदार घोषणाबाजी झाली. त्यानंतर, काही वेळातच दोन्ही गटात हमरीतुमरी झाल्याचंही पाहायला मिळालं. विशेष म्हणजे यावेळी खुद्द नारायण राणे यांनी पोलिसांसमोर येऊन



काही जणांना इशाराच दिलाय. आमच्या जिल्ह्यात येऊन दमदाटी खपवून घेतली जाणार नसल्याचे त्यांनी म्हटले. त्यावेळी, थेट घरातून खेचून रात्रभर मारीन असा इशाराही नारायण राणेंनी राड्यानंतर दिला.

राड्यावेळी पोलीस आणि सुरक्षा रक्षकांशी संवाद साधताना नारायण राणेंचा पार चांगलाच चढल्याचं दिसून आलं. नारायण राणे हे एका ज्येष्ठ राजकीय नेत्यावरून थेट कार्यकर्त्यांच्या भूमिकेत पाहायला मिळाले. आपल्या कार्यकर्त्यांना उद्देशू राणे म्हणाले, ये कोणीही मध्ये यायचं नाही. त्यानंतर, पोलसांना बोलतना, साहेब, पोलिसांना जेवढं सहकार्य करायचंय ते करा, यापुढे पोलिसांविरुद्ध आमच्या जिल्ह्यात सहकार्य असेल तर, आणि तुम्ही त्यांना येऊ द्या, परवानगी द्या, आमच्या अंगावर घाला, घरात खेचून रात्रभर एकेकाला मारून टाकेन, सोडणार नाही, अशा शब्दांत माजी केंद्रीय मंत्री नारायण राणे यांनी घटनास्थळी इशारा दिल्याचे पाहायला मिळाले. तसेच, आम्ही आमच्या भागात आहोत, बाहेरचे येऊन इथं दादागिरी करत असतील, पोलीस त्यांना प्रोटेक्शन देणार असतील तर आम्ही इथून अजिबात हलणार नाही, काही करायचे ते करा, गोळ्या घाला हलणार नाही, असे आंडू पांडू आयुष्यभर पाहिले, आम्ही इथून जाणार नाही, असा आक्रमक पवित्रा नारायण राणे यांनी घेतला होता. एकंदरीत शिवरायांच्या पुतळा दुर्घटनेवरुन आता राजकारण तापल्याचं दिसून येत आहे.

दरम्यान, किल्ल्यावर पोलीस प्रशासन आणि सुरक्षा यंत्रणांकडून दोन्ही गटाच्या कार्यकर्त्यांना समजावून सांगण्याचा प्रयत्न केला जात आहे. पोलिसांनी मध्यस्थी करून दोन्ही गटाला शांत केलं आहे. तसेच, राष्ट्रवादी काँग्रेसचे प्रदेशाध्यक्ष जयंत पाटील हेही घटनास्थळी पोहोचले होते, त्यांनीही या राड्यावेळी मध्यस्थी करून वाद मिटवण्याचा प्रयत्न केला. मात्र, काही वेळातच ते तिथून निघून गेल्याचं पाहायला मिळालं.

# पुतळ्यावरून राजकारण करणे हे बौद्धिक दिवाळखोरीचे लक्षण

## विखे पाटलांचा महाविकास आघाडीवर हल्लाबोल

**सिंधूदुर्ग** : सिंधुदुर्गमधील राजकोट किल्ल्यावरील छत्रपती शिवाजी महाराजांचा पुतळा कोसळल्यानंतर संपूर्ण महाराष्ट्रातून संताप व्यक्त करण्यात आला. दरम्यान, काँग्रेस नेते सतेज पाटील यांनी घटनास्थळी जात पाहणी केली होती. दरम्यान, आज ठाकरेंच्या शिवसेनेचे नेते आदित्य ठाकरे घटनास्थळी पोहोचले. त्याचवेळी भाजप नेते नारायण राणे आणि ठाकरे गटामध्ये जोरदार राडा झाला. आता याबाबत भाजप नेते राधाकृष्ण विखे पाटील यांनी प्रतिक्रिया व्यक्त केली आहे.



शिवाजी महाराजांच्या पुतळ्यावरून राजकारण करणे हे बौद्धिक दिवाळखोरीचे लक्षण

छत्रपती शिवाजी महाराजांच्या पुतळ्यावरून राजकारण करणे हे बौद्धिक दिवाळखोरीचे लक्षण असल्याचे महसूल मंत्री राधाकृष्ण विखे पाटील यांनी म्हटले आहे. नौदलाकडून पुतळ्यासंदर्भामध्ये निकष पडताळून पाहण्यासाठी चौकशी समितीची नेमणूक करण्यात आली आहे. मात्र त्यांना नौदलावरच विश्वास आहे की नाही हा प्रश्न आहे. घडलेली घटना दुर्दैवी आहे. मात्र त्याबाबत केलं जाणार राजकारण हे उचित नसल्याचे देखील विखे पाटील यांनी म्हटलं आहे. छत्रपती शिवाजी महाराजांचा पुतळा पडल्यानंतर मविआकडून सरकारचा निषेध केला जातोय याबाबत महसुलमंत्री राधाकृष्ण विखेंना विचारले असता त्यांनी प्रतिक्रिया दिली आहे.

गणेशोत्सवापर्यंत महामार्गावरील अवजड वाहतूक बंद ठेवण्याचा निर्णय

नगर-मनमाड महामार्गाची प्रचंड दुरवस्था झालेली पाहायला मिळत आहे. याबाबत अहमदनगरचे पालकमंत्री राधाकृष्ण विखेंनी आढावा बैठक घेतली. या रस्त्याच्या दुरुस्तीसाठी गणेशोत्सवापर्यंत या महामार्गावरील अवजड वाहतूक बंद ठेवण्याचा निर्णय घेण्यात आल्याचे पालकमंत्री विखेंनी सांगितले आहे. सोबतच गरज पडल्यास वाहतूक वळण्याची मुदत वाढविण्यात येईल तसेच १५ दिवसात या रस्त्याची तात्पुरती दुरुस्ती केली जाईल असं विखे म्हणाले.

नारायण राणे काय काय म्हणाले?

शिवाजी महाराजांचा पुतळा कोसळल्याची घटना दुर्दैवी आहे. या पुतळ्याचं आठ महिन्यांपूर्वी पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या हस्ते अनावरण झाले होते. मात्र, ऐन पावसाळ्यात जोरदार वाऱ्यांमुळे हा पुतळा कोसळला आहे. मी यामध्ये कोणावर दोषारोप करण्याऐवजी हा पुतळा ज्यांनी बांधला त्या टेक्निशियन लोकांची चौकशी व्हावी, अशी मागणी करतोय. कशामुळे हा पुतळा कोसळला, याचे कारण बाहेर यावे आणि संबंधितांवर कारवाई व्हावी, ही माझी इच्छा असल्याचे रत्नागिरी-सिंधुदुर्गचे खासदार नारायण राणे यांनी म्हणाले.

# लोकसभेतील फटक्यानंतर भाजपची संघाशी दिलजमाई : प्रचार मोहिमेसाठी संघाने दिला गुरुमंत्र

**नागपूर** : लोकसभा निवडणूक प्रचार मोहिमेदरम्यान भारतीय जनता पक्षावर नाराज असलेल्या राष्ट्रीय स्वयंसेवक संघाची नाराजी दूर करण्यात भाजपाला यश मिळाले आहे. त्यामुळे आगामी काळात महाराष्ट्र सहचार राज्यांमध्ये होऊ घातलेल्या विधानसभा निवडणूक प्रचार मोहिमेत संघाचा सहभाग असणार आहे. निवडणूक प्रचार मोहीम राबवताना प्रस्थापित नेत्यांबरोबरच तरुण चेहऱ्यांनाही पुढे आणण्याचा मंत्र संगाने भाजपला दिला आहे.

लोकसभा निवडणुकीत ४०० पारचा नारा येणाऱ्या भाजपाकडून पक्षाची मातृसंस्था असलेल्या राष्ट्रीय स्वयंसेवक संघाची अवहेलनाच करण्यात आली. खुद्द भाजपचे राष्ट्रीय अध्यक्ष जे पी नड्डा यांनीच, भाजपाला आता संघाची गरज उरलेली नाही, असे विधान केले. त्यामुळे संघ या निवडणुकीत तटस्थ राहिला. लोकसभा निवडणुकीत भाजपाला मोठा फटका सहन करावा लागला. विशेषतः या आधीच्या निवडणुकीत भाजपला निर्विवाद यश मिळवून देणारे महाराष्ट्र आणि उत्तर प्रदेश या राज्यात पक्षाला मोठा फटका बसला.

या पार्श्वभूमीवर चार राज्यांच्या विधानसभा निवडणुका तोंडावर आले असताना भाजपाने संघाशी जुळवून घेण्याचे धोरण आखले आहे. त्यानुसार संघ आणि भाजप यांच्या पदाधिकाऱ्यांची बैठक नुकतीच पार पडली. त्यामध्ये प्रामुख्याने भाजपच्या वतीने ज्येष्ठ मंत्री राजनाथ सिंह आणि संघाच्या वतीने सह कार्यवाह दत्तात्रय होसबाळे यांच्यासह अनेक महत्त्वाचे नेते व पदाधिकारी उपस्थित होते. या बैठकीत दोघांकडून समजूतीचे धोरण अंगीकारले गेल्यानंतर आगामी निवडणुकांमध्ये भाजपला सहकार्य करण्याचे संघाचे धोरण असल्याचे दिसून येत आहे.

# श्रीनाथ म्हस्कोबा साखर कारखान्यास सर्वोत्कृष्ट पुरस्कार प्रदान



पुरस्कार स्विकारताना श्रीनाथ म्हस्कोबा साखर कारखाना व्यवस्थापन

**दौंड** : दौंड तालुक्यातील पाटेठाण येथील श्रीनाथ म्हस्कोबा साखर कारखान्यास डेक्कन शुगर टेक्नॉलॉजी स्ट असोसिएशन पुणे यांचे वतीने सन २०२४ चार सर्वोत्कृष्ट साखर कारखाना पुरस्कार प्रदान करण्यात आला आहे.

पुणे येथील कार्यक्रमात हा पुरस्कार राष्ट्रीय साखर कारखाना महासंघाचे अध्यक्ष माजी मंत्री हर्षवर्धन पाटील आणि साखर आयुक्त डॉ. कुणाल खेळणार यांच्या हस्ते श्रीनाथ म्हस्कोबा साखर कारखाना अध्यक्ष पांडुरंग राऊत आणि संचालक यांनी स्विकारला आहे.

डिएसटिएचे देशभरातील साखर उद्योगाच्या विकासासाठी कार्य करणारी संस्था असुन या संस्थेने पुणे येथे ६९ वे अधिवेशन आयोजित करण्यात आले होते. सहकार क्षेत्रात उल्लेखनीय कार्य करणाऱ्या सहकारी संस्थाना यावेळी सन्मानित करण्यात आले.

या वेळी डेक्कन शुगर टेक्नॉलॉजी स्ट असोसिएशन चे अध्यक्ष शहाजीराजे भड, श्रीनाथ म्हस्कोबा साखर कारखान्याचे संचालक लक्षीमण कदम, चंद्रकांत ढमढेरे, महेश करपे, कार्यकारी संचालक दत्ताराम रासकर, कारखान्याचे अधिकारी सर्वश्री. पि.एस. मते, आर. एन. जाधव, आर.एस.शेवाळे, एस. बी. टिळेकर आणी एन.ए . भुजबळ हे उपस्थित होते.

# कै. ज्ञानोजीराव साळुंखे हायस्कूलमध्ये शिल्प कला कार्यशाळा संपन्न

**पाटण** : श्री. स्वामी विवेकानंद शिक्षण संस्था कोल्हापूर संचलित पाटण जि. सातारा येथील कै. ज्ञानोजीराव साळुंखे हायस्कूल व ज्युनि. कॉलेज मध्ये विद्यार्थ्यांच्या सुप्त कलागुणांना वाव मिळावा, सृजनशीलता वाढावी या उद्देशाने बाल शिल्पकारांची एक दिवसाची कार्यशाळा आयोजित करण्यात आली होती .

या विद्यालयाचे प्राचार्य मा. श्री दिलीपराव चरणे यांच्या नियोजनाप्रमाणे व कलाशिक्षक अमर भागवत सर यांच्या मार्गदर्शनाखाली कार्यशाळा संपन्न झाली .

पर्यावरण पूरक अशा शाडू मातीचा, परिसरातील लाल मातीचा वापर करून अमर भागवत यांनी प्रात्यक्षिकातून सुबक अशी गणेश मूर्ती बनविली. त्याप्रमाणे सर्व विद्यार्थ्यांनी गणेशाची मूर्ती बनविली. या कार्यशाळेस पाटण मुले केंद्राचे केंद्र समन्वयक



श्री .विजय खांडके सर यांनी भेट देऊन विद्यार्थ्यांना मार्गदर्शन व कौतुक केले. शाळेचे उपप्राचार्य सुनील शेवाळे व पर्यवेक्षक संजय पवार सर यांनी विद्यार्थ्यांनी तयार केलेल्या मूर्तींचे प्रदर्शन भरवून सर्व विद्यार्थ्यांस , पालकांस पहावयास खुले केले.

मुद्रक, प्रकाशक नरेश विठ्ठल देसाई यांनी राजदंड मिडीया प्रायव्हेट लिमिटेड, प्लॉट क्र. ५७, पवार कॉलनी, सातारासिटी, सातारा ४१५००२ करिता साहस प्रिंट्स, ६७/बी, रामनगर, पवार कॉलनी, शाहूपुरी, सातारा येथे छापून राजदंड मिडीया प्रायव्हेट लिमिटेड प्लॉट नंबर ५७, पवार कॉलनी, सातारासिटी, सातारा ४१५००२ येथे प्रसिद्ध केले. संपादक : नरेश विठ्ठल देसाई, दूरध्वनी - ९८३४६८७३६४, ईमेल - rajdand.punegmail.com RNI No. : 72105, Title Code: MAHMAR17902

Printed and Published by Naresh Vitthal Desai on behalf of Rajdand Media Private Limited Plot no. 57, Pawar Colony, Sataracity, Satara 415002 and Printed at Sahash Prints 67/B, Ramnagar, Pawar Colony, Shahupuri, Satara 415002 and Published at Rajdand Media Private Limited Plot No. 57, Pawar Colony, Sataracity, Satara 415002. Editor : Naresh Vitthal Desai, Phone - 9834687364, Email - rajdand.punegmail.com RNI No. : 72105, Title Code: M-HM-R17902

# छत्रपतींचा पुतळा अवघ्या ८ महिन्यात कोसळतो ही लाजिरवाणी बाब : आ. पृथ्वीराज चव्हाण

**कराड :** छत्रपती शिवाजी महाराज यांच्या पुतळ्याच्या माध्यामातून राजकीय इव्हेंट करत सरकारने पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या हस्ते उद्घाटनचा घाट घातला. त्याचा लोकसभेसाठी राजकीय इव्हेंट केला. पुतळ्याचे काम निकृष्ठ दर्जाचे होते त्यामुळेच तो कोसळला. महाराष्ट्राच्या अस्मीतेलाच धक्का दिला आहे. त्यामुळे त्या विरोधात राज्यभर आम्ही आंदोलन करणार आहोत. मालवणमध्ये घडलेल्या प्रकरणाची जबाबदारी निश्चीत करावी. त्याची नैतिक जबाबदारी स्विकारून मुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस व बांधकाम मंत्री रवींद्र चव्हाण यांनी राजीनामा द्यावा, अशी मागणी माजी मुख्यमंत्री आमदार पृथ्वीराज चव्हाण यांनी कराड शहरातील दत्त चौक येथे केली.

मालवण येथे छत्रपती शिवाजी महाराज यांचा पुतळा कोसळला. त्या घटनेच्या विरोधात आज शहरातील दत्त चौकात छत्रपती शिवाजी महाराज यांच्या पुतळ्या समोर काँग्रेसतर्फे आंदोलन झाले. आमदार पृथ्वीराज चव्हाण यांच्या नेतृत्वाखाली झालेल्या आंदोलनात काँग्रेसचे सर्व पदाधिकारी उपस्थित होते. युवकचे राज्य उपाध्यक्ष शिवराज मोरे, तालुकाध्यक्ष मनोहर शिंदे, अल्पसंख्याक आघाडीचे झाकीर पठाण, माजी नगरसेवक अशोक पाटील, विद्याताई थोरवडे, दिग्विजय पाटील, नाना जाधव यांच्यासह पदाधिकाऱ्यांनी, कार्यकर्त्यांनी भाजप सरकारच्या विरोधात जोरदार घोषणाबाजी केली. महायुतीच्या सरकारच करायच काय खाली डोकं वर पाय, हटा हटा दो बांधकाम मंत्री हटा दो, भष्ट्राचारी मुख्यमंत्री एकनाथ शिंदे हाय हाय, भष्ट्राचारी भाजप सरकारचा निषेध असो, उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस राजीनामा द्या, अशा घोषणा दिल्या. यावेळी आमदार चव्हाण यांच्यासह पदाधिकारी छत्रपती शिवाजी महाराज यांच्या पुतळ्याजवळ तब्बल तासभर ठिय्या मारून बसले होते. त्यांच्या घोषणांनी परिसर दणाणून गेला होता.



यावेळी त्यांनी प्रसिध्दी माध्यमांशी संवाद साधला. आमदार चव्हाण म्हणाले, मालवण येथे पुतळा उभारण्याचे काम अतिशय निकृष्ठ दर्जाचे होते. त्या पुतळ्याच्या माध्यमातून भाजपला लोकसभा निवडणूकीआधी इव्हेंट करायचा होता. राज्यातील मते मिळविण्याची खटपट त्यामागे होती. मात्र असे निकृष्ठ काम केल्याने आज त्याचा विपरीत परिणाम दिसतो आहे. त्यामुळे भाजपने महाराष्ट्राच्या अस्मितेशी खेळ केल्याचे उघड झाले आहे. छत्रपती हे संबंध हिंदुस्थानचे दैवत आहेत त्यामुळे आम्ही या घटनेचा निषेध नोंदवित राज्यभर आंदोलन करणार आहोत. आमचे काही सहकारी मालवण येथे परिसराची पाहणी करायला गेले आहेत. ते परतले की, आंदलनाची पुढची दिशा निश्चीत करण्यात येईल. नौदल दिना दिवशीच छत्रपतींचा पुतळा पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या उपस्थितीत उभा करण्याची घाई केली गेली. मुळ निवीदेत किती दिवसांचा कालवधी होता. त्या दिवसाआधी काम पूर्ण झाले का, त्यासाठी कसले साहित्य वापरले असें अनेक प्रश्न अनुत्तरीत आहेत. त्याचा जाब सरकारला विचारलाच पाहिजे. मालवण येथील राजकोट किल्ल्यावर छत्रपती शिवाजी महाराजांचा पूर्णाकृती पुतळा पडल्याने राज्याच्या अस्मितेवर घाला घातला आहे. त्यामुळे काँग्रेस आक्रमक झाली आहे. मालवण येथे छत्रपती शिवाजी महाराज यांचा पुतळा पडल्याने भ्रष्टाचारी सरकारमधील मुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस व बांधकाम मंत्री रवींद्र चव्हाण यांनी तात्काळ राजीनामा दिलाच पाहिजे.

तसेच आ. पृथ्वीराज चव्हाण म्हणाले, छत्रपती शिवाजी महाराज यांचा पुतळा उभारणीतही भ्रष्टाचार झाला आहे. वास्तविक नौदलाचा सल्ला झुगारून पत्र्याचा पुतळा उभारला गेल्याची आमची माहिती आहे. तो पुतळा नौदलाच्या जागेत असला तरी त्याची जबाबदारी राज्य शासनाकडे आहे. त्यामुळे राज्याचे मुख्यमंत्री शिंदे, बांधकाम मंत्री व उपमुख्यमंत्री म्हणून देवेंद्र फडणवीस काय करत होते, याचाही खुलासा होण्याची गरज आहे. पुतळा उभारण्याचा कालावधी किती होता, स्ट्रक्चर कुणी आणि का बदलले याचीही माहिती जनतेला देण्याची गरज आहे. या साऱ्या प्रकाराची सर्वोच्च पातळीवर चौकशी झाली पाहिजे. नौदल जबाबदार असेल तर त्याची नैतिक जबाबदारी स्विकारून संरक्षण मंत्री राजनाथसिंह यांनी त्याची जबाबदारी स्विकारली पाहिजे.

# उपरा कोण हे विधानसभा निवडणुकीत कोरेगावची जनताच दाखवून देईल : आ. शशिकांत शिंदे

**कोरेगाव :** मी ल्हासुर्णे गावचा रहिवासी असून कोरेगाव विधानसभा मतदारसंघातून दोन वेळा मी आमदार झालो आहे. सर्वसामान्य जनतेचे मला नेहमीच पाठबळ आहे. मी काही उपरा नाही. याउलट तुम्ही उपरे आहात. ब्राझीलला जाऊन तुम्ही बसला होता. ज्यांच्या जीवावर तुम्ही राजकारणात आला, त्यांच्याच विरोधात काम करण्याची तुमची पद्धत आहे. सामान्य जनतेला उपरा कोण हे चांगले माहित आहे. त्यामुळे आमदार महेश शिंदे ज्याप्रमाणे बेताल वक्तव्य करत आहेत, ते अत्यंत चुकीचे आहे. सर्वसामान्य जनतेमध्ये गैरसमज पसरून विधानसभा निवडणुकीत विजय मिळवण्याचा त्यांचा कुटील डाव आहे. मात्र त्यांनी कितीही प्रयत्न केले, कितीही दबाव तंत्र वापरले तरी या निवडणुकीत त्यांचा मी पराभव करणारच आहे. केवळ कोरेगावातच नव्हे तर संपूर्ण राज्यात महायुतीचा पराभव करून महाविकास आघाडी सत्तांतर घडवेल, असा विश्वास आमदार शशिकांत शिंदे यांनी व्यक्त केला.



ल्हासुर्णे येथे पत्रकार परिषद घेऊन त्यांनी आमदार महेश शिंदे यांच्यावर जोरदार टीका केली. राजकारणामध्ये मर्यादा पाळाव्या लागतात. गेली ३५ वर्षे सातारा जिल्ह्याचे नेतृत्व करत असताना, मी मर्यादा पाळल्या. मात्र अपघाताने आणि जिल्ह्यातील बाहेरच्या नेत्यांनी आतून मदत केल्यामुळे आमदार झालेल्या महेश शिंदे यांना मात्र काही मर्यादा उरल्या नाहीत. ते वाटेल तसे आणि मनाला येईल तसे बोलत सुटले आहेत. कुटुंबातील भाष्य करताना त्यांनी माझ्या मुलांच्या बाबत वक्तव्य केले. अगोदर त्यांनी स्वतः आत्मपरीक्षण करण्याची गरज आहे. आपल्या कुटुंबातील सदस्य कुठे आहेत. आपण स्वतः एका पक्षात, आपली पत्नी दुसऱ्या पक्षात. आपण स्वतः, पत्नी आणि बहीण मतदारसंघ पालथा घालताना घराणेशाही अथवा वारस दिसत नाहीत का ? केवळ जनतेमध्ये गैरसमज पसरवायचा, आपण काहीतरी वेगळे करतोय असे दाखवायचे आणि विकासाबाबत बोलायला काही शिल्लक नसल्याने टीकाटिपणी करून स्वतः काहीतरी वेगळे आहे, असे दाखवण्याचा प्रयत्न सुरू आहे. जनता या हुकूमशाही कारभाराला वैतागली आहे. विधानसभा निवडणुकीत परिवर्तन करून जनता निश्चितपणे जागा दाखवणार आहे, असा विश्वास आमदार शिंदे यांनी व्यक्त केला.

अत्यंत नियोजनपूर्वक सुमारे २५ ते २८ हजार मते कमी करण्याचा डाव त्यांनी आखला होता, दोन महिन्यापासून त्याचे प्लॅनिंग होते, मात्र आम्ही वेळीच सावध झाल्याने आणि त्याबाबतीत उठाव केल्याने आठ हजार मतांपर्यंत हा विषय थांबला. यावर बोलायला आमदार महेश शिंदे यांना जागाच राहिली असल्याचा आरोप त्यांनी केला. हजारो कोटी रुपयांच्या निधी आणून विकास कामे केल्याचे दाखवलं मात्र मतात फरक पडत नाही. लोकसभा निवडणुकीत दिसून आले आहे. आम्ही देखील मतदारसंघात दोन दोन ठिकाणी नावे असणाऱ्या मतदारांवर आक्षेप घेतला आहे. जो नियम आमच्या मतदारांवर लावला जाईल, तोच नियम विरोधकांच्या मतदारांवर पण लावला पाहिजे, ही आमची भूमिका आहे. मात्र दबाव तंत्राचा वापर करायचा आणि मनमानी करून आपल्याला अपेक्षित असे काम करून घेण्याची आमदार महेश शिंदे यांची पद्धत आहे. सामान्य जनता, प्रशासन आणि अधिकारी या गोष्टीला वैतागले आहेत. केवळ विधानसभा निवडणूक जाहीर होण्याची आणि आचारसंहिता लागण्याची वाट सर्वजण पाहत आहेत. आचारसंहिता लागल्यानंतर सर्व चित्रपट दिलेला आपल्याला दिसेल असेही त्यांनी निदर्शनास आणून दिले.



**सातारा :** सातारा केसरकर पेठ येथील हरिजन सोसायटीची संरक्षक भिंत

# साताऱ्यात अपार्टमेंटची भिंत कोसळून वाहनांचे नुकसान नागरिकांमध्ये भीतीचे वातावरण

मुसळधार पावसामुळे कोसळून मेहेर सोसायटीच्या आवारातील तीन वाहनांचे नुकसान झाले रात्री साडेबाराच्या दरम्यान हा प्रकार घडला या प्रकारामुळे येथील नागरिकांमध्ये भीतीचे वातावरण निर्माण झाले आहे संबंधित नागरिकांनी मंगळवारी मुख्याधिकाऱ्यांची भेट घेऊन आपली कैफियत मांडण्याचा प्रयत्न केला शाहू चौक ते चार भिंती या रस्त्यादरम्यान डोंगर उतारावर हरिजन गिरीजन सोसायटी आहे या सोसायटीच्या खालच्या बाजूला मेहेर देशमुख सोसायटी असून येथे तीव्र उतार आहे.

रात्री साडेबाराच्या दरम्यान पावसाचा जोर वाढल्यामुळे हरिजन गिरीजन सोसायटीच्या संरक्षक भिंतीचा मोठा भाग अचानक पणे कोसळून मेहेर सोसायटी मधल्या काही नागरिकांच्या घरासमोर कोसळला सुदैवाने या घटनेमध्ये कोणतीही प्राणहानी झाली नाही मात्र घरासमोरील एक रिक्षा एक दुचाकी यांचे मात्र मोठे नुकसान झाले या सोसायटीला तीव्र उतारा असून येथे काही ठिकाणी भराव खचलेला आहे

त्यामुळे नागरिकांमध्ये भीतीचे वातावरण निर्माण झाले हरिजन गिरीजन सोसायटीच्या एका भागामध्ये सिमेंटची पोती ठेवण्यासाठी मोठी खोली बांधण्यात आली होती या नदीकृत बांधकामामुळेच संरक्षक भिंतीवर ताण घेऊन ती कोसळल्याची तक्रार नागरिकांनी केली आहे पालिकेने यापूर्वीच धोकादायक ठिकाणांना नोटीसा बजावलेले आहेत मात्र मुसळधार पाऊस जमिनीचा तीव्र उतार आणि भिंत कोसळल्यामुळे भीतीचे वातावरण यामुळे दिवसभर उलट सुलट चर्चा सुरू होत्या मुख्याधिकारी अभिजीत बापट यांनी याबाबत तातडीने संबंधित इमारतीच्या रहिवाशांनी संरक्षक भिंतीचे बांधकाम करून घ्यावे अशा सूचना केल्या आह

# शिवसेनेचे (उबाठा) एसटी स्थानकात आंदोलन

## दोन हजार फेऱ्या रद्द झाल्याने संताप; कोट्यवधीच्या नुकसानीस जबाबदार कोण?

**सातारा :** मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण योजनेच्या साताऱ्यातील कार्यक्रमासाठी तब्बल ४०० एसटी बसचे बुकींग केल्याने दोन हजार फेऱ्या रद्द झाल्या. त्यामुळे प्रवाशी, वृध्द, ग्रामीण भागातील लोकांना त्रास झाला. पर्यायाने शासनाचे कोट्यवधी रुपयांचे नुकसान झाले. याला जबाबदार कोण? असा सवाल करत शिवसेनेने (उध्दव ठाकरे गट) येथील बसस्थानकाच्या द्वारावर आंदोलन केले.



सातारा शहरात १० दिवसांपूर्वी मुख्यमंत्री माझी बहीण लाडकी योजनेचा कार्यक्रम झाला. या कार्यक्रमासाठी जिल्ह्यातून हजारो महिला आणण्यात आल्या. त्यांच्यासाठी सुमारे ४०० एसटी बस आरक्षित केल्या. दोन हजार बस फेऱ्या रद्द झाल्या. यामुळे प्रवाशांना त्रास सहन करावा लागला. कार्यक्रमाच्या दुसऱ्या दिवशीच रक्षाबंधनाचा सण होता. त्यासाठी बहिणी भावाकडे जाण्यासाठी निघाल्या होत्या. एसटींच्या फेऱ्या रद्द केल्याने त्यांची गैरसोय झाली. राज्य परिवहन महामंडळाने कोणतीही पूर्व माहिती न देता फेऱ्या रद्द केल्या. यामुळे शासनाचे कोट्यवधी रुपयांचे नुकसान झाले, अशी टीका आंदोलकर्त्यांनी केली. आंदोलन सातारा मध्यवर्ती बसस्थानकाच्या गाड्या बाहेर पडण्याच्या गेटवर करण्यात आले. जवळपास २० मिनिटे हे आंदोलन सुरू होते. यामुळे एका मार्गावरील वाहतूक ठप्प झाली होती. अनेक वाहने रस्त्यात अडकून राहिल्याने दुपारी वाहतूक ठप्प झाली. सातारा आगारातील अधिकाऱ्यांनीही आंदोलनकर्त्यांशी चर्चा केली. त्यानंतर आंदोलन थांबवले. तसेच न्याय न मिळाल्यास पुन्हा आंदोलन करण्याचा इशारा जिल्हाप्रमुख सचिन मोहिते यांनी दिला.

# खंडाळा तालुक्यात ओला दुष्काळ जाहीर करण्याची मागणी

**खंडाळा :** संततधार पवासमुळे शेतीचे नुकसान झाले आहे.पिकांचे पंचनामे तातडीने करून खंडाळा तालुक्यात ओला दुष्काळ जाहिर करावा अशा मागणीचे निवेदन राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाच्यावतीने प्रशासनाला देण्यात आले.

वाई-खंडाळा-महाबळेश्वर विधान सभा अध्यक्ष डॉ.नितिन सावंत यांच्या नेतृत्वाखाली राष्ट्रवादीच्या शिष्टमंडळाने खंडाळ्याचे तहसिलदार अजित पाटील यांची भेट घेवून निवेदन दिले.यावेळी जेष्ठ नेते तात्यासाहेब नरुटे,शहराध्यक्ष महेंद्र गाढवे,प्रकाश गाढवे,गोंविद गाढवे,सुमित गायकवाड,उमेश बोडके,योगेश क्षिरसागर, निलेश खुडे,सुधाकर गाढवे,अमोल गाढवे यांच्यासह आदी मान्यवर उपस्थित होते.

संततधार पाऊस झाल्यामुळे तालुक्यात बरीचशी पिके पाण्याखाली गेली आहेत. पिकांचे पंचनामे करून आर्थिक अडचणीत सापडलेल्या शेतकऱ्यांना दिलासा मिळावा.यासाठी खंडाळा तालुक्यात ओला दुष्काळ जाहिर करावा, अशा मागणीचे निवेदन देण्यात तहसिलदार अजित पाटील यांना दिले आहे.

मागील आठदिवसापासून अतिवृष्टी होत आहे. दुष्काळाने शेतकरी होरपळले असताना,दुष्काळाचा सहाय्य निधी अद्याप पन्नास टक्के शेतकऱ्यांना मिळालेला नाही. तर दुसरीकडे अतिवृष्टीने उभ्या पिकाची नासाडी झाली आहे. त्यामुळे प्रशासाने दखल घेऊन शेतकऱ्यांना न्याय द्यावा अशी मागणी डॉ. नितिन सावंत यांनी केली आहे.



# खासदार नितीन पाटील यांचे जिल्हयात जंगी स्वागत

**खंडाळा :** महायुतीकडून राज्यसभेवर बिनविरोध खासदार म्हणुन निवडुन आलेले सातारा जिल्हा मध्यवर्ती बँकेचे चेअरमन नितीन पाटील यांचे मंगळवारी जिल्ह्याच्या सीमेवर स्वागत करण्यात आले.

महायुतीतील सर्व घटक पक्ष अणि राष्ट्रवादी काँग्रेसच्यावतीने खासदार श्री.पाटील यांचे जिल्ह्याच्या सीमेवर शिंदेवाडी (ता. खंडाळा) येथे पदाधिकाऱ्यांकडून स्वागताची जय्यत तयारी करण्यात आली होती.यावेळी तालुक्यातील शिंदेवाडी,शिरवळ येथे फटाक्यांची आतषबाजी करित क्रेनच्या सहाय्याने पुष्पहार घालून खा.नितिन पाटील यांचे जिल्हा परिषदेचे माजी अध्यक्ष उदय कबुले, खंडाळा साखर कारखान्याचे उपाध्यक्ष राजेंद्र तांबे, सरपंच रविंद्र दुधगावकर आदी मान्यवरांनी स्वागत केले.

दरम्यान, महामार्गावर पारगांवला जेसीबीतून पुष्पवृष्टी करित जेष्ठ नेते बकाजीराव पाटील सरपंच अनिल रिठे यांनी स्वागत केले तर खंडाळ्यात ड. शामराव गाढवे, तालुकाध्यक्ष दत्तानाना ढमाळ, नगरपंचायतीच्या नगराध्यक्षा उज्वला संकपाळ, उपनगराध्यक्ष सुधीर सोनवणे,नगरसेवक योगेश संकपाळ, संदीप गाढवे, उद्योजक नितिन ओहाळ, खंडाळा बार असोशिएनकडून अध्यक्ष ड.पी.व्ही. पाटील,जावेद पठाण,नगरसेवक भाऊसाहेब पाटील यांनी स्वागत केले.

खा.पाटील यांच्या वाहनांचा ताफा महामार्गापासून खंडाळा शहरातील मुख्य रस्त्याने पंचायत समितीमध्ये दाखल झाला.यावेळी फटाक्यांची आतिषबाजी करण्यात आली.नुतन खासदार नितिन पाटील यांनी डॉ.बाबासाहेब आंबेडकर, यशवंतराव चव्हाण यांच्या पुतळ्यास व जवळच असाणाऱ्या स्मृती स्तंभास पुष्पहार अर्पण करून अभिवादन केले.

त्यानंतर माजी नगराध्यक्ष नंदाताई गायकवाड,नगरसेविका मोनिका मोरे, शिवाजीनगरचे माजी सरपंच राजेंद्र भोसले,सुरेश रासकर,अजय भोसले, पंचायत समितीच्यावतीने सहाय्यक गटविकास अधिकारी प्रकाश बोंबले यांच्यासह विविध मान्यवरांनी स्वागत केले.

# आझाद मैदानातील काही आंदोलनकर्त्यांची शिस्त

**मुंबई :** कुठेही न्याय मिळाला नाही की आझाद मैदान गाठायचे. सरकारला निवेदन द्यायचे. सरकारने आश्वासन दिले की गाव गाठायचे. मात्र आंदोलन झाल्यावर आपण आझाद मैदान किती स्वच्छ ठेवले ? याचा विचारही आंदोलनकर्त्यांनी केला तर आम्हा स्वच्छ्ता कामगारांना थोडे परिश्रम कमी पडतील. भले मोठे आझाद मैदान साफ करताना आमच्या नाकी नऊ येतात, जरा आमचाही विचार आंदोलनकर्त्यांनी केला तर बरे होईल असे मत स्वच्छ्ता दुत करत आहेत.

पाण्याच्या बाटल्या, तंबाखू गुटखा पाकीट, वडापाव भजी पाव खाऊन झाल्यावरचे कागद, पार्सल मागितलेले जेवणाची प्लास्टिक डिश, प्लास्टिक ग्लास, झेंडे, टोप्या, पत्रके, फलक, काळ्या निषेध करायच्या पट्ट्या,



चहाचे कप आदी कचरा व पावसामुळे झालेला चिखल या सर्व कचऱ्यामुळे दुर्गंधी पाहता आंदोलन करत असताना पोलिस पत्रकार व स्वतः आंदोलन करणाऱ्यांना स्वच्छ वातावरण असेल तर आनंदी वाटेल. न्याय मागत असताना आपण काय करतोय याकडेही पहावे असे मत त्यांनी व्यक्त केले.

# खजुन्या पेन्शन योजनेसाठी शासकीय कर्मचाऱ्यांचा पुन्हा आंदोलनाचा इशारा

**सातारा :** शासकीय निमशासकीय कंत्राटी नगरपंचायत अंशकालीन रोजंदारी कर्मचाऱ्यांना जुनी पेन्शन योजना लागू करावी यासह विविध मागण्यांसाठी २९ ऑगस्ट रोजी पुन्हा बेमुदत धरणे आंदोलन करण्याचा इशारा सातारा जिल्हा समन्वय समितीचे निमंत्रक नेताजी दिसले यांनी दिला आहे . त्यांनी पत्रकार परिषदेत या गोष्टीची माहिति दिली

ते म्हणाले जुन्या पेन्शन योजनेच्या संदर्भात शासनाने समिति नेमूनही त्याबद्दलचा स्वयंस्पष्ट निर्णय दिलेला नाही .अद्याप जुन्या पेन्शन योजनेसाठी शासनाकडून चाल ढकल होत आहे, जुन्या पेन्शन योजना संदर्भात शासनाने मार्गदर्शन करावे नवीन पेन्शन योजना रद्द करून ती जुनी लागू करावी कंत्राटी योजना कामगार प्रदीर्घकाळ सेवेत असताना समान वेतन कायदा देऊन त्यांची सेवा नियमित करावी, निवृत्तीचे वय ६० करावे, नवीन शिक्षण धोरण रद्द करावे, शिक्षक शिक्षकेतर कर्मचाऱ्यांचे सेवांतर्गत प्रश्न तात्काळ सोडवावेत, मागासवर्गीय कर्मचाऱ्यांची सध्या रोखलेली पदोन्नती तत्काळ सुरू करावी, वय ८० ते १०० या वयातील निवृत्त कर्मचाऱ्यांसाठी केंद्र शासनाने विहित मासिक पेन्शनमध्ये वाढ करावी, कामगार कर्मचारी शिक्षकांच्या हक्कांचा संकोच करणारे कामगार कायद्यातील मालकधार्जिण धोरण रद्द करावे, शिक्षण सेवक ग्रामसेवक यांना मिळणाऱ्या मानधनात वाढलेल्या महागाईचा विचार करून वृद्धी करण्यात यावी अशा विविध मागण्या दिसले यांनी केल्या आहेत.

या संदर्भात शासकीय कर्मचारी संघटना समन्वय समितीने मार्च २०२३ व डिसेंबर २०२३ यामध्ये बेमुदत बंदची हाक देऊन शासकीय कर्मचाऱ्यांची ताकद दाखवून दिली होती

.शासनाने अद्याप कोणत्याही निर्णयासंदर्भात ठोस भूमिका न घेतल्याने संपूर्ण महाराष्ट्रामध्ये कर्मचारी व शिक्षकांमध्ये संतापाची लाट आहे या मागण्यांच्या आग्रहासाठी समन्वय समितीने पुनशक्तीवर संघर्ष करण्याचा इशारा दिला आहे महाराष्ट्रातील सर्व कर्मचारी शिक्षक शासकीय कर्मचारी दिनांक २९ ऑगस्ट पासून बेमुदत संपावर जाऊन याबाबतचा रोज व्यक्त करणार असल्याचा इशारा देण्यात आला आहे.

# खड्डे मुक्त कोल्हापूरसाठी शहरातील सर्व ८१ प्रभागांमध्ये आंदोलन

**कोल्हापूर -** कोल्हापुरातील खड्डे बुजवण्यासाठी विशेष बाब म्हणून ५० कोटी द्यावेत , अशी मागणी आमदार ऋतुराज पाटील यांनी केली . आज खड्डे मुक्त कोल्हापूरसाठी काँग्रेस पक्षाला कोल्हापूर शहरातील सर्व ८१ प्रभागांमध्ये आंदोलन केलं .नवीन वाशी नाका चौकात केलेल्या आंदोलनावेळी आमदार ऋतुराज पाटील बोलत होते .

यावेळी कार्यकर्ते नागरिकांकडून सरकारविरोधात निदर्शन करून जोरदार घोषणाबाजी करण्यात आली .

- कोट्यवधीचा निधी खर्च करूनही कोल्हापुरातील रस्ते खड्डेमय झाले आहेत. त्यामुळ नागरिकांना प्रचंड त्रास सहन करावा लागत आहे. त्यामुळ राज्य सरकारने विशेष बाब म्हणून खड्डे दुरुस्तीसाठी महापालिकेला



५० कोटी रुपयांचा विशेष निधी मंजूर करावा , अशी मागणी आमदार ऋतुराज पाटील यांनी केलीय. खड्डे मुक्त कोल्हापूरसाठी आज काँग्रेस पक्षाच्यावतीन शहरातील सर्व ८१ प्रभागांमध्ये एकाच वेळी आंदोलन करण्यात आल. यावेळी जुना वाशी नाका चौक इथल्या आंदोलनावेळी आमदार ऋतुराज पाटील बोलत होते.यावेळी सर्व खड्ड्याभोवती रांगोळ्या काढून फुलं वाहण्यात आली तसंच खड्ड्यांचं पुरोहितामार्फत पूजनही करण्यात आलं .यावेळी कोल्हापूरला खड्डेपुर करणाऱ्या महायुती सरकारचा धिक्कार असो, महागळती सरकारचा धिक्कार असो, रस्ते द्या रस्ते द्या - आम्हाला चांगले रस्ते द्या, रस्ते आमच्या हक्काचे - नाही सरकारच्या बापाचे, कोल्हापूरवर प्रशासकराज लादणाऱ्या महायुती सरकारचा धिक्कार असो, अरे टॅक्स भरतोय रस्ते द्या, अरे फाळा भरतोय रस्ते द्या' अशा घोषणांनी परिसर दणाणून गेला होता. यावेळी महिलांनी खड्ड्याभोवती रांगोळी काढल्या. त्याचबरोबर पुरोहितांच्या उपस्थिती खड्ड्याना फुल वाहून त्यांची पूजा करण्यात आली.

यावेळी आमदार ऋतुराज पाटील म्हणाले, खासदार शाहू महाराज आणि आमदार सतेज पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली आपण स्वतः, आमदार जयश्री जाधव, आमदार जयंत आसगावकर शहर प्रमुख सचिन चव्हाण, स्थायी समितीचे माजी सभापती शारंगधर देशमुख यांच्या नेतृत्वाखाली खड्डे मुक्त कोल्हापूरसाठी काँग्रेसच्यावतीन आम्ही आंदोलन करत आहोत. कोल्हापुरातल्या रस्त्यांसाठी २७८ कोटी रुपये निधीची मागणी शासनाकड केली होती. त्यातील १०० कोटी रुपये रस्त्यांसाठी मिळाले असे म्हणतात ,पण रस्ते कुठे आहेत? हाच प्रश्न आहे. रस्त्यांसाठी निधी मिळावा यासाठी आम्ही नगरोत्थानसह विविध विभागाकड वारंवार पत्रव्यवहार केला आहे. मात्र राजकीय विरोधातून हा निधी मिळू शकलेला नाही. आम्ही पत्र दिल म्हणून नको पण कोल्हापुरकरांची गैरसोय होऊ नये यासाठी तरी शासनान खड्डे बुजवण्यासाठी ५० कोटी रुपयांचा विशेष निधी महापालिकेला मंजूर करावा , अशी मागणी आमदार ऋतुराज पाटील यांनी यावेळी बोलताना केली.

यावेळी काँग्रेसचे शहराध्यक्ष सचिन चव्हाण, माजी स्थायी समिती सभापती शारंगधर देशमुख, माजी नगरसेविका रीना कांबळे, नंदकुमार पिसे , मधुकर रामाणे, युवराज तेली, धीरज पाटील, अभिजीत खतकर, गणपतराव मुळीक, गुरूप्रसाद जोशी, सुनील वर्मा, सतीश बरगे,दुर्वास कदम , किरण पाटील, गणेश मोरे, उदय सासने,सुयोग मगदूम , दिग्विजय मगदूम, सदाशिव कवडे नागरिक मोठ्या संख्येन उपस्थित होते.

## शिरोळात शनिवारी यादव प्रेमी युवा मंचच्यावतीने तालुक्यातील सर्वात मोठ्या दहीहंडी सोहळ्याचे आयोजन

**शिरोळ :** येथील यादव प्रेमी युवा मंचच्यावतीने शिरोळातील दहीहंडी सोहळ्याचे जनक स्व. शिवाजीराव यादव यांच्या स्मरणार्थ शनिवार दिनांक ३१ ऑगस्ट २०२४ रोजी सायंकाळी ६ वाजता शिरोळ येथील पद्माराजे विद्यालयाच्या क्रीडांगणावर शिरोळ तालुक्यातील सर्वात मोठ्या दहीहंडी सोहळ्याचे आयोजन करण्यात आले आहे दहीहंडी फोडणाऱ्या पुरुष गोविंदा पथकास १,११,७७७ रुपये रोख रक्कम आणि पाच फुटी कायम चषक तर महिला गोविंदा पथकास ५१ हजार रुपयांचे रोख रकमेचे पारितोषिक दिले जाणार आहे अशी माहिती यादव प्रेमी दहीहंडी महोत्सवाचे संयोजक भालचंद्र ठोंबरे यादव प्रेमी युवा मंचचे अध्यक्ष अजित देशमुख यांनी आयोजित पत्रकार परिषदेत दिली आहे

यावेळी बोलताना ठोंबरे व देशमुख म्हणाले की युवानेते पृथ्वीराजसिंह यादव यांच्या नेतृत्वाखाली यादव प्रेमी युवा मंचच्यावतीने गोकुळाष्टमीनिमित्त प्रत्येक वर्षी दहीहंडी सोहळ्याचे आयोजन केले जाते यावर्षी शनिवारी सायंकाळी ६ वाजता शिरोळच्या पद्माराजे विद्यालयाच्या क्रीडांगणावर दहीहंडी महोत्सव होणार आहे या दहीहंडी महोत्सवाची जय्यत तयारी करण्यात आली आहे शिरोळ तालुक्यातील सर्वात मोठा दहीहंडी सोहळा या ठिकाणी होणार आहे दहीहंडी फोडणाऱ्या पुरुष गोविंदा पथकास एक लाख ११ हजार ७७७ रुपये रोख रक्कम पाच फुटी कायम चषक दिला जाणार आहे तर शिरोळ तालुक्यात पहिल्यांदाच महिला दहीहंडी सोहळ्याचे आयोजन करण्यात आले आहे यासाठी महिला गोविंदा पथकांना निमंत्रित करण्यात आले आहे ही दहीहंडी फोडणाऱ्या महिला गोविंदा पथकास ५१ हजार रुपयांचे रोख रकमेचे पारितोषिक दिले जाणार आहे या दहीहंडी सोहळ्यासाठी अद्यावत साऊंड सिस्टिम लेसर शो नेत्रदीपक विद्युत रोषणाई करण्यात येणार आहे मुंबईतील कलाकारांचा डान्स शो आयोजित करण्यात आला आहे दहीहंडी सोहळा पाहण्यासाठी महिला प्रेक्षकांसाठी स्वतंत्र गॅलरी तयार करून बैठक व्यवस्था करण्यात येणार आहे

या दहीहंडी सोहळ्यासाठी कर्नाटक राज्याच्या महिला व बाल विकास मंत्री लक्ष्मी हेब्बाळकर आणि रंग माझा वेगळा मराठी मालिकेतील व अल्याड पल्याड चित्रपटातील अभिनेत्री अनुष्का पिपूंटकर यांच्यासह विविध क्षेत्रातील मान्यवर उपस्थित राहणार आहेत

यादव प्रेमी युवा मंचच्यावतीने प्रत्येक वर्षी शिरोळ तालुक्यातील सर्वात मोठा दहीहंडी सोहळा थाटात साजरा करण्याचा आमचा नेहमीच प्रयत्न असतो यावर्षीही अशाच पद्धतीने नेटका दहीहंडी सोहळा होणार आहे हा सोहळा पाहण्यासाठी परिसरातील नागरिकांनी शनिवार दिनांक ३१ ऑगस्ट २०२४ रोजी सायंकाळी सहा वाजता शिरोळमधील पद्माराजे विद्यालयाच्या क्रीडांगणावर मोठ्या संख्येने उपस्थित राहावे असे आवाहन शेवटी भालचंद्र ठोंबरे व अजित देशमुख यांनी केले आहे

या पत्रकार बैठकीस राहुल यादव सिताराम शिंदे या प्रमुखासह यादव प्रेमी युवा मंचचे सर्व पदाधिकारी कार्यकर्ते उपस्थित होते.

यादव प्रेमी युवा मंचच्या वतीने शिरोळ तालुक्यात प्रथमच महिला गोविंदा पथकांना निमंत्रित करून महिला दहीहंडी सोहळा आयोजित करण्यात आला आहे याकरिता अनेक शहरातील महिला गोविंदा पथक येणार आहेत तसेच परिसरातील महिलांना तालुक्यातील सर्वात मोठा दहीहंडी सोहळा पाहण्यासाठी पद्माराजे विद्यालयाच्या क्रीडांगणावर स्वतंत्र गॅलरी निर्माण करून त्यांची बैठक व्यवस्था करण्यात येणार आहे

## युवतीवर अत्याचार : तरुणावर गुन्हा दाखल

पाटण: तालुक्यातील भोसगाव येथील एका मुलीवर लग्नाचे अमीष दाखवून वारंवार अत्याचार केल्याची संतापजनक घटना उघडीस आली आहे. याप्रकरणी पीडितेच्या फिर्यादीवरून ढेबेवाडी पोलीस ठाण्यात संशयितावर पोक्सो कायद्यांतर्गत गुन्हा दाखल करण्यात आला.


याबाबत पोलिसांकडून मिळालेली माहिती अशी, तालुक्यातील ढेबेवाडी भागातील भोसगाव येथील पिडीत मुलगी व आरोपी यांचे एकत्र शिकत असल्यापासून प्रेमसंबध आहेत. आरोपीने पिडीत मुलीस ती अल्पवयीन असल्यापासून तिला लग्नाचे अमीष दाखवून, तसेच प्रेमाचे नाटक करुन तिचा गैरफायदा घेत वारंवार तिच्या घरात जाऊन, तसेच तिला आपल्या राहत्या घरी बोलावून तिच्यासोबत शारीरिक संबध प्रस्तापित केले. त्यानंतर संबंधित पिडीत मुलीने लग्न करण्यासाठी तगादा लावला असता आरोपीने तिला उडवाउडवीची उत्तरे दिली. पिडीत मुलीस काहीही न सांगता त्याने मागील महिन्यात दुसऱ्या मुलीसोबत साखरपुडा करुन पिडीत मुलीस फसवून तिला लग्नाचे अमीष दाखवून तिच्यासोबत वारंवार शारीरिक संबध ठेवले आहेत. याप्रकरणी सदर पिडीत मुलीने ढेबेवाडी पोलीस ठाण्यात तक्रार दिली असून त्यानुसार आरोपीविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

# सर्व कायदे ठेकेदारांच्या खिश्यात

## महिला व मुलींची सुरक्षा धोक्यात

**मुंबई :** सरकारी बाबू , लोकप्रतिनिधी आपली जबाबदारी व कर्तव्य ठेकेदारांच्या विश्वासावर ठेऊन बसल्याने ठेकेदारांच्या मनमानी कारभाराला वेसन कोणी घालत नाही. सफाई कामगार, सुरक्षा रक्षक किंव्हा इतर कोणत्याही कामगारांची ठेकेदार शहानिशा करत नसल्याने मुली व महिलांच्या सुरक्षेबाबत प्रश्नचिन्ह निर्माण झाले असून महिला मुलींची सुरक्षा धोक्यात आल्याचे वास्तव आहे.

अस्तिवात आहेत त्याच कायद्याची अंमलबजावणी होत नसताना बदलापूर किंव्हा इतर बलात्काराच्या घटनेनंतर नवीन नियमावली कायदे बनवले जात असल्याने ठेकेदाराच्या खिशात बसलेल्या सरकारी बाबूंच्या मनमानी कारभारावर आपोआप पांघरून घातले जात आहे. त्यामुळे कांत्रादारावर थातूरमातूर कारवाई दाखवत पुन्हा ये रे माझ्या मागल्या अशी स्थिती आहे.



बदलापूर येथे शाळेतील बलात्काराची घटना, महिला वसतिगृहात केअर टेकर ने महिलांना केलेली छेडछाड, बँकांच्या ए टी एम मधील गुन्हेगारी पार्श्वभूमी असलेले परप्रांतीय सुरक्षा रक्षक, दक्षिण मुंबईत शॉपिंग सेंटरच्या महिला प्रसाधनगृहात वकील महिलेवरचा अतिप्रसंग, परप्रांतीय सुरक्षा रक्षक संदीप पांडे याला केलेली अटक, सार्वजनिक व खाजगी स्वच्छतागृहात सफाई करणाऱ्या व्यक्तीची गुन्हेगारी पार्श्वभूमी माहिती नसणे, सन १९८१ च्या शासनाच्या महाराष्ट्र सुरक्षा रक्षक मंडळ कायद्याचे खाजगी सुरक्षा ठेकेदार कडून होणाऱ्या उल्लंघन, परप्रांतीय तडीपार गुंडांचा सुरक्षा रक्षक म्हणून वावर, अशा अनेक प्रकारे सुरू असलेला मनमानी कारभार थांबविण्यासाठी दिवंगत गृहमंत्री आर आर पाटील यांनी जी उपाय योजना केली होती त्याकडे कोणतीच यंत्रणा गांभीर्याने पाहत नाही. त्यामुळे अशा घटना वारंवार होत आहेत.

खाजगी सुरक्षा करणारे काही भक्षक ठिकठिकाणी महिलांच्या जीवावर टपले आहेत. बदलापूर सारखे प्रकार रोज होत असताना परप्रांतीय सुरक्षा रक्षक, सफाई कामगार किती आहेत. त्यांची सर्व कौटुंबिक पार्श्वभूमी, गुन्हेगारी पार्श्वभूमी सरकारकडे उपलब्ध नाही. ठेकेदाराने दिलेली तेवढीच खोटी माहिती असल्याने परराज्यातून तडीपार केलेले गुंड सुरक्षा रक्षकाची, सफाई कामगारांची नोकरी करत असताना पकडले असून त्यांना तुरुंगात देखील टाकले आहे.

दिवंगत गृहमंत्री आर आर पाटील यांनी राज्यातील सर्व खाजगी सुरक्षा रक्षकांची एकत्रित माहिती गोळा करून त्याचा एकत्रित डाटा जमा करावा. एका क्लिकवर तो उपलब्ध व्हावा. यासाठी प्रयत्न केले होते. मात्र पुढे सरकारने व गृहविभागाने अद्यापही गांभिर्याने काहीच कृती केली नाही. त्यामुळे परप्रांतीय सुरक्षा रक्षकाकडून महिलांच्या विनयभंगाच्या घटना सुरूच आहेत व त्या सुरूच राहतील अशी भीती महिला व्यक्त करत आहेत.

खाजगी सुरक्षा रक्षक एजन्सी चे मालक मंत्रालयात बिनधास्तपणे फिरत असतात. त्यांना कोणाचा आशीर्वाद असतो ? १९८१ साली सरकारने सुरक्षा रक्षक कायदा केला. अनेक कंपन्या, मॉल, बँका, आस्थापना,कारखाने, सरकारी महामंडळे इतर सरकारी कार्यालयात फक्त महाराष्ट्र सुरक्षा रक्षक मंडळाचे नोंदणी कृत सुरक्षा रक्षक नियुक्त केले पाहिजेत. जर सुरक्षा मंडळाकडे सुरक्षा रक्षक नसतील तर सरकारचे अधिकृत पत्र घेऊन खाजगी सुरक्षा रक्षक कंपनीने आपली सुरक्षा यंत्रणा त्या ठिकाणी कार्यरत करावी असा कायदा आहे.

## माणमध्ये ५०,७३५ ठरल्या लाडक्या बहिणी, आणखी लाभार्थी बहिणी वाढणार : आप्पासाहेब पुकळे

**म्हसवड :** राज्यातील सर्वसामान्य महिलांना आर्थिक दृष्ट्या मदत व्हावी म्हणुन राज्य सरकार ने खास महिलावर्गासाठी सुरु केलेल्या मुख्यमंत्री माझी लाडकी बहिण योजनेचा लाभ माण तालुक्यातील ५०७३५ एवढ्या लाभार्थी बहिणींना देण्यात आला असुन ये - त्या काही दिवसांत आणखी बहिणींना याचा लाभ आपण मिळवुन देणार असल्याची माहिती या योजनेच्या अशासकीय समितीचे अध्यक्ष आप्पासाहेब पुकळे यांनी दिली.

मुख्यमंत्री माझी लाडकी बहिण योजनेची तालुकास्तरीय आढावा बैठक माण तहसील कार्यालयात पार पडली, यावेळी तहसीलदार विकास अहिर, गटविकास अधिकारी प्रदीप शेंडगे, बालविकास प्रकल्प अधिकारी शंकर इंगळे, म्हसवड नगरपालिकेचे मुख्याधिकारी डॉ.सचिन माने, दहिवडी नगरपंचायतीचे मुख्याधिकारी प्रदीप घार्गे, यांच्यासह या योजनेतील संरक्षण अधिकारी आणि विस्तार अधिकारी उपस्थित होते.

यावेळी माण तालुक्यातील गाववार लाभार्थी बहिणींची आकडेवारी जाणुन घेताना अध्यक्ष पुकळे यांनी पुढील माहिती दिली.

पुकळे यांनी दिलेल्या माहितीनुसार ०१ ऑगस्ट २०२४ पर्यंत ३३८०४ एवढ्या लाभार्थ्यांना लाभ मिळाला असून आज नव्याने १६९३२ एवढे अर्ज मंजूर करण्यात आले आहेत. योजना लागू झाल्यापासून माण तालुक्यातील ५०७३५ एवढ्या महिलांना सदर योजनेचा लाभ प्रशासकिय पातळीवर देण्यात यश आले असुन अद्यापही या योजनेचा लाभ देण्याचे काम सुरू आहे.

रोज ७०० ते ८०० अर्ज भरणे चालू आहे, त्या अर्जांना तालुकास्तरीय प्रशासकीय स्तरावर तात्काळ मंजुरी दिली जात आहे. नगरपालिका क्षेत्रात म्हसवड नगरपालिकेचे मुख्याधिकारी डॉ. सचिन माने, तर दहिवडी येथे प्रदीप घार्गे हे काम पाहत आहेत. तर गटविकास अधिकारी प्रदीप शेंडगे हे ग्रामीण भागासाठी काम पाहत असल्याचे पुकळे यांनी यावेळी सांगितले.

## जिल्हा पोलीस अधीक्षकांनी 'या' दोन पोलीस कर्मचाऱ्यांना केलं बडतर्फ



**कोल्हापूर -** कोल्हापूर पोलीस दलातील दोघा सख्या भावांना जिल्हा पोलीस अधीक्षकांनी बडतर्फ केलंय. पोलीस अंमलदार विष्णू शिंदे आणि पोलीस अंमलदार एम आर शिंदे असं या दोघा पोलीस कर्मचाऱ्यांची नावे आहेत. या दोघांच्यावर अवैध व्यवसायिकांशी लागेबांधे असल्याचा ठपका ठेवण्यात आला होता. या प्रकरणी जिल्हा पोलीस अधीक्षक महिंद्र पंडित यांनी त्यांच्यावर बडतर्फची कारवाई केली आहे.

विष्णू शिंदे व एम आर शिंदे हे दोघे इचलकरंजी शहरातील शिवाजीनगर पोलीस ठाणे आणि शहापूर पोलीस ठाण्यामध्ये कार्यरत होते. त्यांची कारकीर्द वादग्रस्त होती. त्यांच्या विरोधात वरिष्ठाकडे अनेक वेळा तक्रारीही आल्या होत्या. या कारवाई मुळे पोलीस दलात एककज खळबळ उडाली आहे.

## आत्तेभावानेच केला अल्पवयीन बहिणीवर अत्याचार

**पाटण :** आत्तभावानच १५ वषाय बाहणावर अत्याचार केल्याची धक्कादायक घटना कोयना परिसरातील एका गावात घडली. या प्रकरणी बाललैंगिक अत्याचार कायदा (पोक्सो) अंतर्गत कोयना पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल झाला. पोलीस उपअधीक्षक विजय पाटील यांनी हे प्रकरण अत्यंत गांभीर्याने घेत तात्काळ कारवाईसह चौकशीसत्र सुरू केले. दरम्यान, हा प्रकार ४ जून २०२४ रोजी घडला असल्याचे फिर्यादीत म्हटले असून यावरही पोलीस तपास करत आहेत.

पोलिसांकडून मिळालेली माहिती अशी, गेल्या अनेक वर्षापासून कोयना विभागातील एका गावात वास्तव्यास असणाऱ्या पण सध्या दुसरीकडे राहण्यासाठी गेलेल्या एका १५ वर्ष ५ महिने वयाच्या अल्पवयीन मुलीवर आत्तेभावाने अत्याचार केला. संबधित मुलगी ४ जून २०२४ रोजी घरात एकटी असताना आत्तेभावाने जबरदस्तीने अत्याचार केला. हा प्रकार घडल्यानंतर संबंधित कुटुंब भीतीच्या छायेत होते. दरम्यान, पीडित मुलीच्या नातेवाईकांनी कोयनानगर पोलीस ठाण्यात धाव घेतली. त्यांची हकीकत ऐकून घेतल्यावर बोंद्री येथील तरुणावर पोक्सो कलमांतर्गत गुन्हा दाखल झाला. पाटणचे पोलीस उपअधीक्षक विजय पाटील यांनी तात्काळ संशयिताला अटक करण्यासाठी स्वतः सापळा रचला.

# छत्रपती शिवरायांच्या पुतळ्याचे विरोधकांनी राजकारण करू नये

**सातारा :** मालवण येथील समुद्रकिनाऱ्यावरील छत्रपती शिवरायांचा पुतळा कोसळणे ही घटना दुर्दैवी आहे मात्र तो एक अपघात आहे मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी त्या जागेवर पुन्हा तसाच आणि तितकाच भव्य पुतळा उभारण्याचे आश्वासन दिले आहे मात्र विरोधकांनी या मुद्द्यावरून राजकारण करू नये छत्रपती शिवराय हे सर्वांनाच वंदनीय आहेत हा विषय राजकारणाचा नाही असा स्पष्ट इशारा राज्याचे उत्पादन शुल्क मंत्री तथा सातारा जिल्ह्याचे पालकमंत्री शंभूराजे यांनी पत्रकार परिषदेत दिला आहे .

जिल्हाधिकारी कार्यालयात झालेल्या आढावा बैठकीनंतर जिल्हा प्रशासनाच्या वतीने घेण्यात आलेल्या निर्णयांची माहिती देताना शंभूराज देसाई पत्रकारांशी बोलत होते पत्रकारांनी विचारलेल्या विविध प्रश्नांना त्यांनी उत्तरे दिली .छत्रपती शिवरायांचा मालवण येथील सहा महिन्यापूर्वी उभारण्यात आलेला शिवपुतळा कोसळला या प्रश्नावर



बोलताना शंभूराजे म्हणाले ही एक दुर्दैवी घटना आहे मात्र तो अपघात होता समुद्रकिनाऱ्यावर खाऱ्या वाऱ्याचा वेग ताशी ४५ किलोमीटर होता पुतळ्याने गंज पकडला होता त्यामुळे हा अपघात झालेला आहे .मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी या घटनेबाबत दुःख व्यक्त करून त्या जागी तसाच भव्य पुतळा उभारण्याच्या आश्वासन दिले आहे या संदर्भात विरोधकांनी कोणतेही राजकारण करू नये अथवा या विषयाचे भांडवल करू नये छत्रपती शिवराय हे महाराष्ट्रालाच नव्हे तर संपूर्ण देशाला वंदनीय आहेत. महाविकास आघाडीचे नेते वेगवेगळ्या विषयांवर उठ सूट महायुतीच्या तीन घटक पक्षांवर सातत्याने टीका करत असतात त्यांच्या संदर्भात बोलणे योग्य नाही असा टोला त्यांनी लगावला

बदलापूर प्रकरणातील कारवाई संदर्भात आदित्य ठाकरे यांनी महायुती शासनावर टीका केली होती या संदर्भात बोलताना शंभूराज म्हणाले आदित्य ठाकरे स्वतः मंत्री होते पोलीस कारवाई कशी असते याची त्यांना पूर्ण माहिती आहे या प्रकरणांमध्ये संबंधित अपशब्द वापरणाऱ्या इसमावर ट्रॉसिटी गुन्हा दाखल झाला आहे या गुन्ह्याची पडताळणी उपअधीक्षक दर्जाचा पोलीस अधिकारी करतो यामध्ये तथ्यंश आढळून आल्यानंतर दोषींवर निश्चित कारवाई केली जाईल मुख्यमंत्री तीर्थ दर्शन योजनेअंतर्गत सातारा जिल्ह्यातील एक हजार यात्रेकरूंना महाराष्ट्र तील आणि अन्य राज्यातील तीर्थक्षेत्रांवर सहल घडवली जाणार आहे यासंदर्भात पालकमंत्र्यांना तीर्थस्थळे सुचवण्याचा अधिकार आहे यासंदर्भात लोकप्रतिनिधींशी चर्चा करून याबाबतची स्थळे ठरवली जातील असे ते म्हणाले लाडकी बहीण योजनेचा दुसरा टप्पा सुरू असून १ लाख ८७ हजार प्रकरणाची छाननी करण्यात आली आहे तसेच सात लाख नऊ हजार पात्र लाभार्थी बहिणींना अनुदान मंजूर करण्यात आले आहे तांत्रिक कारणामुळे ८००० लाडक्या बहिणींचे प्रस्ताव नाकारण्यात आलेले आहेत यामध्ये नाव चुकीचे असणे आधार कार्ड ला खाते लिंक नसणे अथवा पत्त्याचा गोळा असे तांत्रिक कारणे आहेत मात्र ते दुरुस्त करण्यासाठी प्रशासन यंत्रणेला निर्देश देण्यात आल्याचे त्यांनी सांगितले.

महायुती मध्ये वारंवार जागा वाटपावरून राजकीय खटपट सुरू असल्याचे प्रश्न देसाई यांना विचारले असता ते म्हणाले आमची महायुती अत्यंत मजबूत आहेत आमच्यात कोणतेही मतभेद नाहीत सातारा जिल्हा मध्यवर्ती बँकेचे अध्यक्ष नितीन पाटील हे खासदार झाल्यामुळे महायुतीची शक्ती वाढली आहे दोन खासदार सहा आमदार असे आमचे राजकीय बल झाले आहे आगामी विधानसभा निवडणुकीतही महायुतीचे आमदार बाजी मारतील असा ठाम विश्वास त्यांनी व्यक्त केला.

मल्हारपेठ येथील ग्रामीण रुग्णालयाचा अंतिम प्रस्ताव राज्य शासनास सादर करण्यात येणार आहे तसेच उरुल येथील लघुपाटबंधारे प्रकल्पाचा आराखडा अंतिम झाला आहे याबाबत ठेकेदाराने वेळेत काम सुरू केले नाही तर त्याचे नाव काळा यादी टाकणार असल्याचा इशारा शंभूराज देसाई यांनी दिला लाडकी बहीण योजनेअंतर्गत राष्ट्रीयकृत बँका अनुदान कापत असल्याचा प्रश्न देसाई यांना विचारण्यात आला तेव्हा देसाई म्हणाले राष्ट्रीयकृत बँकांच्या समितीच्या बैठकीत त्यांना संपूर्ण अनुदान देण्याचा निर्देश देण्यात आलेला आहे जर कोणी शाखा व्यवस्थापक अनुदान कापून घेत असेल तर अशांवर कठोर कारवाई करण्याचे निर्देश जिल्हाधिकाऱ्यांना दिले आहेत असे त्यांनी स्पष्ट केले.